# २०) ज्ञानेश्वरीतील नेतृत्वाचे विशेष गुण

**ह. भ. प. श्री. सुभाष महाराज गेठे**

मराठी साहित्यातील तेराव्या शतकात एक प्रतिभावंत कवी, लेखक, दार्शनिक, तत्त्वज्ञ, योगी आणि संत म्हणजे श्री संत ज्ञानेश्वर महाराज. केवळ वयाच्या १६ व्या वर्षी सच्चिदानंद बाबांना पुनरोज्जीवित करून श्रीमद् भगवद्गीतेवर मराठीत सर्वोत्तम भाष्यकार म्हणून संत ज्ञानेश्वर महाराजांची ओळख सर्व जगाला झाली आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अनंत सद्गुणांची खाण आहे. प्रस्तुत पाठात आपण ज्ञानेश्वरीतील नेतृत्वाच्या विशेष गुणांचा परामर्श घेणार आहोत. श्री ज्ञानेश्वर महाराजांकडे नेतृत्वाचे असामान्य पैलू असल्यामुळे ते सर्व ज्ञानेश्वरीत प्रतिबिंबित झालेले दिसतात.

संस्कृत भाषेतील नी – नय या धातूपासून नेता शब्द तयार झाला आहे. नी – नय म्हणजे नेणे. जो समाजाला, राष्ट्राला किंबहुना विश्वाला शाश्वत तत्त्वांच्या मूल्यांच्याकडे घेऊन जातो तो नेता. आपल्या कृतीतून, आचरणातून जो समाजाला प्रेरक नेतृत्व देतो तोच खरा नेता होय. नेता हा मुखाप्रमाणे असतो. हाताच्या पाच बोटांनी आपल्याच ताटातील उचललेला घास मुखात टाकला जातो. त्यापासून सप्तधातूंची निर्मिती होते. रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा, शुक्र हे सात धातू आहेत. मुखाने चावलेल्या अन्नापासून रक्त तयार होते. ते रक्त शरीराच्या सर्व अवयवांपर्यंत समानतेने सर्वत्र पोहोचविले जाते. त्यानुसारच मुखाप्रमाणे मुख्य असणारा नेता त्यांनी आपल्या जवळ असणाऱ्या नेतृत्वगुणामुळे सर्व समाजाला जो उच्च प्रगतीकडे घेऊन जातो तो नेता होय. श्री संत ज्ञानदेवांच्या कडे नेतृत्वाचे असंख्य पैलू आहेत

त्यापैकी प्रमुख खालीलप्रमाणे.

**१) नम्रता :** नेत्याची देहबोली ही समाजाच्या समोर सतत असते. समाज त्याचे अनुसरण करत असतो. देहबोली जशी नम्र असते तसाच स्वभाव आणि भाषासुद्धा नेत्याची नम्र असावी लागते. शब्दात समयसूचकता, प्रेरकता, आकर्षकता, सहानुभूती, प्रामाणिकता, मृदूता आणि दूरदृष्टीता असावी लागते.

श्री संत ज्ञानदेवांकडे एवढी मोठी श्रेष्ठता आहे, की ते प्रत्यक्ष विष्णूचे अवतार आहेत.

**महाविष्णूचा अवतार। सखा माझा ज्ञानेश्वर।।**

एवढी प्रभुता असूनसुद्धा ज्ञानेश्वरीच्या प्रारंभाला मी अज्ञानी, मूर्ख, अविवेकी आहे परंतु गुरूंची कृपा लाभल्यामुळे मी गीतेवर ज्ञानेश्वरीच्या रूपाने भाष्य करत आहे, असे म्हटले आहे. यातून श्री ज्ञानेश्वर महाराजांची नम्रता अभिव्यक्त होते. आपल्या गुरूंच्या समोर मी एक अजाण लहान बालक आहे, म्हणून माझ्यावर मातृवत प्रेम करत असल्यामुळे माझे ते कौतुक करत आहेत, असे म्हणतात. मी जे - जे काही करत आहे ते सर्व माझे श्री गुरूच माझ्याकडून करून घेत आहेत, एवढी पराकोटीची नम्रता अभिव्यक्त करतात. विनय किंवा नम्रता ही नेत्याची खरी संपत्ती आहे.

**येऱ्हवीं तरी मी मूर्खु। जरी जाहला अविवेकु।**
**तऱ्ही संतकृपादीपकु। सोज्वळु असे।।७६।।** अ. १

**बाळक बापाचिये ताटीं रिगे। आणि बापातेंचि जेवऊं लागे।**
**कीं तो संतोषिलेनि वेगें। मुखचि वोढवी।।१५।।**

**तैसा मी जरी तुम्हांप्रती। चावटी करीतसें बाळमती।**
**तरी तुम्ही संतोषिजे ऐसी जाती। प्रेमाची या।।१६।।** अ. ९

ज्याप्रमाणे सूत्रधार दोऱ्यांच्या माध्यमातून बाहुल्यांना नाचवितो, हे सर्व कौशल्य सूत्रधाराचे असते बाहुल्यांचे नव्हे. श्री संत ज्ञानदेव श्री गुरू निवृत्तिनाथांना आपल्या आयुष्याचे सूत्रधार समजतात आणि स्वतःकडे बाहुल्यांची भूमिका घेतात.

**सायिखडयाचें बाहुलें। चालवित्या सूत्राचेनि चाले।**
**तैसा मातें दावीत बोलें। स्वामी तो माझा।।१७६८।।** अ. १८

कळसूत्री बाहुले चालकाच्या हातात असलेल्या दोरीच्या विशिष्ट हालचालीने जसे चालवावे तसे चालते, त्याप्रमाणे मला श्रोत्यांच्या पुढे निमित्तमात्र दाखवीत तो माझा स्वामी श्रीगुरू निवृत्तिनाथच बोलत आहेत.

**२) कृतज्ञता :** आपल्यासाठी ज्यांनी उपकार केले आहेत त्या उपकारांची सतत जाणीव ठेवणे म्हणजे कृतज्ञता. उपकाराची जाणीव न ठेवता उपकाऱ्यावरती अपकार करणे ही कृतघ्नता श्री ज्ञानेश्वर महाराजांना मान्य नाही. अशी कृतघ्न व्यक्ती भस्मासुरासारखी असते, जी स्वतःचा विनाश स्वतःच ओढवून घेते. ज्ञानेश्वरी कृतज्ञता हा नेतृत्वाचा गुण शिकवते. सतत मोठ्यांचा आदर करणे कृतज्ञतेचे एक लक्षण आहे. संपूर्ण श्री ज्ञानेश्वरी लिहून झाल्यानंतर समारोप करताना श्री ज्ञानदेव भगवान वेद व्यासांची आणि जगद्‌गुरू आद्य शंकराचार्य यांची कृतज्ञता व्यक्त करतात. व्यासांनी भगवान श्रीकृष्णांचे शब्द गीतेच्या माध्यमातून ग्रथित केले आणि शंकराचार्यांनी त्यावर संस्कृत भाष्य केले. हे सर्व ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या अगोदर केल्यामुळे मला त्याचा आधार मिळाला म्हणून मी ‘श्री ज्ञानेश्वरी’ हा ग्रंथ मराठी भाषेत करू शकलो, अशी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतात.

**तैसा व्यासाचा मागोवा घेतु। भाष्यकारांतें वाट पुसतु।**
**अयोग्यही मी न पवतु। के जाईन।।१७२२ ।।**

त्याप्रमाणे मी गीतार्थ जाणण्यास अनधिकारी असलो, तरीपण गीतेचे श्लोक रचून पुढे गेलेल्या बादरायण व्यासांचा मागोवा (त्यांनी रचलेल्या श्लोकातील पदरूपी पावलांच्या खुणा) शोधीत शोधीत, आणि भाष्यरूपाने गीतेच्या मार्गावर उभे असलेले भाष्यकार श्रीमद आद्य शंकराचार्य यांना अर्थाची वाट विचारीत जात आहे. त्यामुळे मी गीतेच्या सत्यार्थाला प्राप्त न होता दुसऱ्या विपरीत अर्थाच्या गावाकडे कसा जाईन?

ज्येष्ठ श्रेष्ठांच्या विषयी कृतज्ञता आणि सेवा कशी करावी हे गुरू श्री निवृत्तिनाथांनी मला शिकविले आहे.

**ज्ञानदेव म्हणे तुम्ही। संत वोळगावेति आम्हीं।**
**हें पढविलों जी स्वामी। निवृत्तिदेवीं।।२४७।।**

३) आदर : आई-वडील, गुरू, वयाने ज्येष्ठ आणि ज्ञानाने श्रेष्ठ अशी मंडळी समोर आली असता किंवा घरी आली असता त्वरित त्यांच्या सामोरे जाऊन हात जोडून त्यांना नमस्कार करणे, त्यांच्या पायावर नतमस्तक होणे आणि स्मित हास्य करून त्यांची विचारपूस करत आपल्या कुवतीप्रमाणे आदर-सत्कार करणे हासुद्धा एक नेतृत्वाचा महत्त्वाचा गुण आहे. मोठ्या व्यक्तीकडे दुर्लक्ष करणे हे एक प्रकारचा अपमान करण्यासारखेच असते. हा दोष नेत्याच्या प्रगतीला प्रतिबंध करणारा आहे. आदरणीय असणाऱ्या भगवान विष्णूच्या चरणापासून निघालेली गंगा भगवान शंकराने मस्तकावर धारण करून श्रद्धेय वस्तूचा आदर कसा करावा हे सांगितले आहे. असे भगवान शंकर जर गुरू झाले तर श्रद्धेय वस्तूचा आदर करण्याचे कौशल्य आपण शिकू शकतो असे श्री ज्ञानदेव महाराज म्हणतात.

**तरी श्रद्धावस्तूसी आदरु। करितां जाणिजे प्रकारु।**
**जरी होय श्रीगुरु। सदाशिवु।।१६।।**

श्रेष्ठ प्रतीचा आदर असला तर एकलव्यासारखा भिल्लाचा मुलगा सुद्धा त्रैलोक्यात सर्वश्रेष्ठ धनुर्वेत्ता होऊ शकतो. एकलव्याने द्रोणाचार्यांच्या मातीच्या पुतळ्याला गुरू समजून ज्ञान ग्रहण केले, असा महाभारताचा संदर्भ आधाराच्या संबंधाने संत ज्ञानेश्वर महाराज देतात.

**श्रीगुरूचेनि नांवें माती। डोंगरीं जयापासीं होती।**
**तेणें कोळियें त्रिजगतीं। येकवद केली।।३१ ।।**

**४) इतरांची क्षमता विकसित करणे :** प्रत्येकाच्या ठिकाणी कोणता तरी एखादा विशेष गुण असतो, तो ओळखता आला पाहिजे. प्रत्यक्ष त्याचा उपयोग दैनंदिन व्यवहारात करता आला पाहिजे. श्री संत ज्ञानदेवांनी गीतेवर ज्ञानेश्वरीच्या रूपाने भाष्य करून एक आदर्श प्रस्थापित केला. याचाच परिणाम तत्कालीन सर्व



समाजातील घटकांनी पुढे येऊन परमार्थाची साधना करत करत ओव्या अभंगाची रचना केली. सिद्धबेटात भिक्षेच्या निमित्ताने निर्माण झालेल्या विमनस्क परिस्थितीचे माध्यम करून श्री संत मुक्ताईच्या कडून ताटीच्या अभंगांची रचना करून घेतली. या अभंग रचनेचे आदर्श समोर ठेवूनच नामदेव महाराजांच्या घरातील सर्व स्त्री संतांनी आणि चोखोबारायांच्या पत्नीने म्हणजेच सोयराबाईंनी आणि मुलीनेसुद्धा अभंग रचना केली. कान्होपात्रा, संत तुकाराम महाराजांची शिष्या संत बहिणाबाई या सर्वांच्या मध्ये वाङ्मय निर्मितीची क्षमता श्री ज्ञानेश्वर महाराजांनी विकसित केलेली दिसते. भिक्षेला प्रतिबंध करणाऱ्या विसोबा खेचरला नामदेव महाराजांचे गुरू होण्याची क्षमतासुद्धा श्री ज्ञानेश्वर महाराजांनी विकसित केली.

**५) वचनबद्धता :** जे आपण बोलतो त्याला जबाबदार बोलणाऱ्यानेच असले पाहिजे. हा एक नेतृत्वाचा महत्त्वाचा गुण आहे. ज्ञानेश्वरीची रचना करताना श्रोत्यांच्या समोर सर्व सुखाला पात्र होण्याची प्रतिज्ञा ज्ञानदेवांनी केली. परंतु ही प्रतिज्ञा फक्त शब्दापुरतीच न राहता श्रोत्यांनी जर मनाने, शरीराने आणि वाचेने या ज्ञानेश्वरी ग्रंथाचे विनम्र होऊन सेवक भावाने श्रवण, मनन केले तर ते स्वानंद साम्राज्याचे चक्रवर्ती होतील, असे आश्वासन श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या शेवटी दिले आहे.

**म्हणौनि मनें कायें वाचा। जो सेवकु होईल इयेचा।**
**तो स्वानंदासाम्राज्याचा। चक्रवर्ती करी।।१६६७।।** अ. १८

**६) सामाजिक प्रेरणेचे आदर्श :** स्वतःला कोणतेही कर्तव्य नसतानाही समाजाच्या आदर्श जडणघडणीसाठी नेत्याला दीपस्तंभाप्रमाणे काही आदर्श स्वतःच्या कृतीतून समाजापुढे ठेवता आले पाहिजेत. श्री संत ज्ञानदेवांनी आपल्या मनातील आवड प्रकट करताना मी

खांद्यावर पताका घेऊन पंढरपूरला वारीसाठी जाईन, असे सांगून ते पंढरपूरला जात राहिले. त्याचा परिणाम आज लाखोंच्या संख्येने भाविक देहभाव विसरून समतेचा आणि विश्वबंधुत्वाचा संदेश घेऊन वारीला जातात. यातून व्यापक स्वरूपामध्ये समाज शाश्वत मूल्यांच्याद्वारे एकत्रित बांधला जातो.

**माझ्या मनीची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी।।**

या वचनोक्तीची परिपूर्ती म्हणजे आजची वारी होय.

**७) सहानुभूती :** ज्या समाजामध्ये आपण राहतो, त्यांच्याशी व्यवहार करतो त्या समाजाचे सुख-दुःख आपल्या स्वतःच्या सुख-दुःखाप्रमाणे समजले पाहिजे. समाजाच्या सुख-दुःखाच्या विषयी संवेदनशील वृत्ती सतत असली पाहिजे. हे सांगत असताना श्री संत ज्ञानदेव काट्याचा दृष्टांत देतात. अनवाणी चालणाऱ्या व्यक्तीच्या पायात काटा टोचला तर त्याच क्षणी डोळ्यात पाणी येते. पाय आणि डोळा यांच्यात अंतर आहे, परंतु दुःखाच्या संवेदनेचे वहन त्वरित होते. तसे दुसऱ्याचे दुःख तितक्याच वेगाने आणि संवेदनशीलतेने समजणे हा आदर्श नेतृत्वाचा एक गुण आहे. ज्याप्रमाणे तळपायांना शीतलता प्राप्त झाली की त्याचा परिणाम डोळ्यांनाही शीतलता प्राप्त होते. तद्वत दुसऱ्याच्या सुखाने सुखी होणे हा एक महत्त्वाचा गुण आहे.

**पैं पायीं कांटा नेहटे। तंव व्यथा जीवीं उमटे।**
**तैसा पोळे संकटें। पुढिलांचेनि।।१५९।।**

**कां पावो शीतळता लाहे। कीं ते डोळ्याचिलागीं होये।**
**तैसा परसुखें जाये। सुखावतु।।१६०।।** अ. १६

नेता कसा हवा? त्याच्याजवळ कोणते विशेष हवेत? त्याच्याजवळ स्वसामर्थ्याची प्रखर जाणीव हवी, आत्मविश्वास हवा,

पण इतरांना दुखविणारा अहंकाराचा, अस्मितेचा दर्प नको, प्रौढी नको, भाषेवर जबरदस्त हुकमत हवी, मूलतःच मृदु-मवाळ असणारी ज्ञानदेवांची लडिवाळ भाषा, प्रसंगी किती कठोर व उपरोधिक बनते याची अनेक उदाहरणे ज्ञानेश्वरीत मिळतात. ज्या समाजासाठी हे प्रबोधन आहे, त्याच्या गुणदोषांची अचूक उमज हवी, आणि आपण करीत असलेल्या प्रबोधनाची, त्याच्या परिणामांचीही कल्पना या नेतृत्वाला असायला पाहिजे. मुळातील गीतेच्या सातशे श्लोकांचा सुमारे नऊ सहस्र ओव्यांमध्ये झालेला हा विस्तार या दृष्टीने बोलका आहे.

आज समाजात व्यक्तिविकासावर अधिक भर आहे. ज्ञानदेवांच्या काळातील समाजाला समष्टीच्या हिताची अधिक काळजी होती. या समष्टीप्रधान समाजाचे नेतृत्व करताना विधायक समाजसुधारकाची भूमिका ज्ञानेश्वरांनी कधीच सोडली नाही. त्यांनी कठोर शब्दांनी प्रहार केले ते समाजाच्या दुर्वर्तनावर, समाजघातक प्रवृत्तींवर, समाजातील यज्ञ करण्याच्या हिंसाचारी वर्तनावर व तेही श्रीकृष्ण-वचनांच्या आधारे, हे कार्य करीत असताना हल्ला रोगावरच राहिला पाहिजे, हे भान ते कधीही विसरले नाहीत. समाजात काय किंवा व्यक्तीमध्ये काय बदल घडवायचा असेल, तर उघडपणे त्याची चूक दाखविल्याने बदल कधीच घडत नसतो. चूक दाखविण्याच्या अनेक पद्धती आहेत. चुका करणाऱ्या व्यक्तीला चारचौघांत लज्जित करण्याने ती व्यक्ती कधीच सुधारणार नाही, याची जाणीव श्री ज्ञानेश्वरांना आहे. अशा प्रसंगी ते आपल्याकडे लहान बालकाची भूमिका घेतात. ज्या समाजाने त्यांचे मातृपितृसुख हिरावून घेतले, त्याच समाजाला मातापित्याच्या स्थानी मानतात आणि बालकाच्या लडिवाळपणाने समाजाला जिंकून घेतात.

समाजमन हे बालकासारखे व काही प्रमाणात भाबडे आहे याची समज असलेला हा समाजसुधारक स्वतःकडे कधीच मोठेपणाची भूमिका घेत नाही, 'एकले अवधान दिजे।' असे सांगून समाजाजवळ असलेला चांगुलपणा जागृत करतात.

त्यांच्यासमोरचा श्रोता हा समाजाच्या सर्व थरांतील होता. त्यात पुण्यसंचयासाठी यज्ञयाग करणारे याज्ञिक होते, संस्कृताभिमानी पंडित होते आणि साधुसंतही होते. या सगळ्यांना ते वंदन करतात, **'वक्ता हा वक्ताचि नोहे। श्रोतेविण।'** असे त्यांचे आभारही मानतात, पण त्याच वेळी गीतेतील **'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति।'** यावर निरूपण करताना यज्ञ करणाऱ्यांवर कठोर टीकाही करतात, पण ती टीका श्रीकृष्णाने केली आहे, ही भूमिका समाजासमोर कायम ठेवतात.

**मग तया पुण्याची पाउटी सरे। सवेंचि इंद्रपणाची उटी उतरे।**
**आणि येऊं लागती माघारें। मृत्युलोका।।३२८।।**
**जैसा वेश्याभोगीं कवडा वेचे। मग दारही चेपूं नये तियेचे।**
**तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें। काय सांगों।।३२९।।** अ.९

समोर बसलेल्या श्रोत्याचा दोष न सांगता, निरूपणाच्या द्वारा याज्ञिकांचे दाखवून दिलेले हे स्थान समाजावर अधिक प्रभाव पाडते. या प्रकारच्या पद्धतीने व्यक्ती दुखावली जात नाही. समाजात व्यक्तीला हास्यास्पद करणे सोपे असते, पण त्यामुळे काहीच साधत नाही. समाजात सुधारणा घडवायची असेल तर प्रत्यक्ष व्यक्तीला बोल लावण्यापेक्षा कल्पनेतील व्यक्तींचा दोष सांगणे अधिक परिणामी असते. ही विधायक समाज- सुधारकाची दृष्टी ज्ञानेश्वरी लेखनाचा हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने परिणामकारक ठरते.

त्यांच्या विधायक नेतृत्वाला पोषक अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. त्या उदाहरणांपेक्षा त्यामागील समाजाबद्दल सहानुभूती

बाळगणाऱ्या नेतृत्वाला अधिक महत्त्व द्यावे लागते. एकीकडे समाजाला **'प्रभु तुम्ही महेशाचिया मूर्ती।'** म्हणून भजणारा हा नेता या 'महेशा'चे सामर्थ्य ओळखून आहे. क्षणात संतापणारा, क्षणात शांत होणारा हा 'महेश' जर नेमकेपणाने जाणता आला तरच आपले प्रबोधन-निरूपण फलद्रूप होईल याची त्यांना पुरेपूर जाण आहे. यासाठी त्यांच्यातील प्रतिभावंतांचे त्यांना साहाय्य घेता येते. एकीकडे **'वक्ता हा वक्ताचि नोहे श्रोतेविण।'** अशी श्रोतृवर्गाची भलावण करताना व **'श्रोता दुश्चित तरी वितुळे। मांडिला रसु।।'** अशी त्यांच्या अवधानाची अपेक्षा व्यक्त करताना, त्यांना समोरच्या श्रोत्यांमध्ये असा 'दुश्चित' श्रोता आढळत नसेलच असे नाही, पण त्याला ते दोष देत नाहीत, पण त्याचे हे दुश्चितपण त्याचे त्याला कळावे, अशा कलात्मकतेने सूचित करतात. उदा. नवव्या अध्यायाच्या शेवटी, श्रीकृष्णाच्या मुखीच्या अमृताच्या वर्षावात अर्जुन-संजया- सह सर्व श्रोते न्हाऊन निघतात. अष्टसात्त्विक-भावांनी फुलून आलेला संजय धृतराष्ट्रही आपल्यासारखाच स्वतःला कृतकृत्य समजत असेल या खात्रीने धृतराष्ट्राकडे पाहू लागतो....तर त्याला काय दिसते? अंगावरून अमृताचा पूर वाहत गेला तरी त्याचा धृतराष्ट्रावर कोणताच परिणाम उमटलेला नसतो. हा म्हैसा तसाच परिणाम- शून्य आहे. **हा येथ असतुचि गेला। सेजेया गावा।** पण हे बोलावे कसे? हा तर साक्षात अन्नदाता! त्याचे दोष आम्ही कसे दाखविणार, आम्ही कोण?....

धृतराष्ट्राला उद्देशून संजयाच्या तोंडी ज्ञानदेवांनी घातलेले हे उद्गार, समोरचे चतुर श्रोते ओळखू शकतील. श्री ज्ञानेश्वरांसारखा वक्ता आपल्यासमोरच्या श्रोत्यांचे दोष प्रत्यक्ष कसे सांगतील? कारण हे श्रोतेच त्यांचे मायबाप आहेत. त्यांच्या अवधानामुळे तर ज्ञानदेवांना तत्त्वज्ञान सांगण्याचे सुचले. ते वक्त्याच्या स्फूर्तीचे दाते आहेत,

कलात्मक सूचकतेने दोष कसे सांगावे, याचे यासारखे अनेक प्रकार ते ज्ञानेश्वरीत योजत असलेले दिसतात.

ज्ञानेश्वरीचा उपसंहार करताना जे पसायदान येते त्यात नेतृत्वाची अनेक गुणवैशिष्ट्ये दृष्टिक्षेपात येतात. व्यक्तींना दोष देण्याऐवजी त्यांच्यातील दोष सद्गुण प्रदान करून दूर करणे. चांगल्या लोकांना एकत्रित आणून त्यांच्यात मैत्री घडवून आणणे. प्रत्येकाला आपापल्या कार्याचे महत्त्व पटवून देऊन चुकीच्या प्रवृत्तीचे समूळ उच्चाटन केले तर सर्वांच्या इच्छा कशा पूर्ण होतात हे पटवून देणे. सहज समाजात फिरताना त्यांच्या भेटीगाठी घेताना, समाजाच्या गरजा पूर्ण करण्याचे गुण कल्पवृक्षाप्रमाणे नेत्याकडे असले पाहिजे. वास्तव आश्वासनाचा वर्षाव करून ती आश्वासने समाजात जाऊन पूर्ण होतात की नाही याची खात्री करून घेणे. आश्वासन पूर्तीसाठी प्रशासकीय अधिकारी समाजाच्या दारात नेणे. नेतृत्व करणाऱ्यांचे बोलणे अमृताप्रमाणे गोड व रसाळ असावे. वैयक्तिक चारित्र्यावर लांच्छन नसावे. आपल्याकडे येणाऱ्या लोकांवर सतत राग-संताप करून मोठ्याने ओरडू नये. समाजाला नेता हा जवळचा, नातेवाइकाप्रमाणे प्रेमळ वाटला पाहिजे. चिंताग्रस्त समाजाला चिंतामुक्त करता आले पाहिजे. नेत्याच्या विचाराला तात्त्विक आधिष्ठान असले पाहिजे. भक्ती-प्रेमाचा ओलावा असला पाहिजे. समाजाच्या सुखाने सुखी होण्याची वृत्ती विकसित करावी. विद्यार्थ्यांना उत्तम ग्रंथ व गुणवान शिक्षक उपलब्ध करून शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार नाहीसा करत असताना प्रत्येकाला गुणवत्तेप्रमाणे योग्य न्याय देणे, इत्यादी नेतृत्वाचे गुण ज्ञानेश्वरी शिकविते.